# राजकीय भूगोल

## घटक २. राजकीय भूगोलातील संकल्पना

# सरहद्दी व सीमा (Boundaries & Frontiers)

सरहद्दी व सीमा या राज्याच्या राजकीय भूगोलात मुख्य सामाजिक व राजकीय संघटना व भूप्रदेश यांना विभक्त करणारे महत्त्वाचे रचनात्मक भूदृष्य आहे.

अर्थाच्या संदर्भात सरहद्दी व सीमा हे दोन्ही शब्द राजकीयदृष्ट्या संघटित परिधीय (Peripheral) वैशिष्ट्य असून, अभौगोलिक साहित्यात समान अर्थाने वापरले जातात. मात्र, दोन्हीचे अर्थ भिन्न आहेत. या दोन्हीमध्ये मूलभूत फरक आहे.

सरहद्द (Boundry) हा सार्वभौमत्वासाठी असलेला घटक आहे. सार्वभौम हे मर्यादेने घेरलेले (वेढलेले) असते. सार्वभौम राज्य असलेले जग हे सरहद्दीने विभक्त झालेले असतात; म्हणून सरहद्दीच्या आधुनिक जागतिक अर्थव्यवस्थेचे हे आवश्यक अंग आहे.

याउलट, सीमा विभाग (प्रदेश) (Frontier zone) दोन सामाजिक पद्धतीमधील क्षेत्र आहे. याच्या दोन्ही बाजूस विरोधी शक्ती असते किंवा परस्पर तटस्थ राहून स्थिर भौगोलिक स्थिती असलेला भाग असतो.

प्राचीन काळातील प्रादेशिक राज्यांच्या (Teritorial States) अस्तानंतर राजकीय अधिकार असलेली विविध आकाराची राज्ये उदयास आल्यावर सीमा लुप्त होऊन सरहद्दींची निर्मिती झाली. यामुळे राज्याच्या सीमाविषयी असलेली गोंधळाची स्थिती संपली.

# सरहद्दी (Boundaries)

## सरहद्दीची (सीमारेषा) संकल्पना (Concept of Boundary):

राजकीय राजकारणशास्त्रानुसार सरहद्दी (Boundaries) या राज्यांच्या सार्वभौमत्त्वाच्या मर्यादा असल्याने, त्या महत्त्वाच्या असतात. त्या राज्याराज्यांमधील भूप्रदेशांच्या सीमा जेथे भिडतात, त्या ठिकाणाहून काढल्या जातात.

ऐतिहासिककाळानुसार बदललेल्या कार्यामुळे सरहद्दीचे (सीमारेषा) स्वरूप बदलले. वाढती लोकसंख्या आणि त्यामुळे वाढत गेलेली लोकवस्ती यामुळे शासनाला अचूक अशा सरहद्दी निश्चित करणे आवश्यक झाले. अलीकडच्या काळात दोन सार्वभौम राज्यांच्या सीमा जेथे मिळतात, तेथून सरहद्दी आखलेल्या आढळतात. जोन्स या तज्ज्ञाच्या मते, सरहदी ह्या भौगोलिक आणि ऐतिहासिक- सामाजिक परिस्थितीशी संबंधित असतात.

वास्तविक सरहद्दीची संकल्पना ही प्राचीन काळातील (ग्रीक व रोमन कालखंड) दोन मानवी समूहांनी व्यापलेल्या व वापरात असलेल्या प्रदेशांच्या दरम्यान असलेल्या मर्यादशी निगडित आहे. प्रत्यक्षात पूर्वी मानवी समूह सरहद्दीच्या संकल्पनेशी परिचित होते. त्याकाळात वापरात नसलेल्या, हक्क नसलेल्या व वसाहत न केलेल्या प्रदेशात लोक जरी प्रवेश करीत असले, तरी त्यावर कोणीही आपला अधिकार सांगत नसे. आफ्रिकेतील काही जमातीमध्ये असा दृष्टिकोन आजही असलेला दिसतो. चिनी व रोमन यांच्या प्राचीन सरहद्दीच्या संकल्पनेनुसार राज्यांच्या सरहद्दी स्थिर व अचूक असाव्यात ही गोष्ट सरहद्दीवरील भक्कम भिंतीवरून स्पष्ट होते. अँग्लो सॅक्सनांनी राज्यकारभार व सुरक्षिततेसाठी राज्याभोवती भिंती बांधल्या होत्या, ज्यामुळे त्यांच्या राज्याच्या सरहद्दी निश्चित झाल्या होत्या.

मध्ययुगीन किंवा सरंजामशाही राज्यातील राज्यकर्त्यांना त्यांच्या राज्याची निर्मिती, त्याचा विस्तार व राज्याच्या सरहद्दीविषयी कोणतीही माहिती नव्हती. यासंबंधी कधी काही प्रश्न उद्‌भवल्यास ते स्थानिक लोकांना विचारीत. त्या काळात राज्यांच्या सरहद्दी अनिश्चित असल्याने, त्यावेळचे नकाशे ठिगळाप्रमाणे होते. त्यावेळी राज्ये विखुरलेली होती. त्यामुळे सरहद्दीचा फारसा प्रश्न येत नसे.

परंतु, वाढती लोकसंख्या व त्यामुळे साधनसंपत्तीचा होणारा मोठ्या प्रमाणात वापर यामुळे सरहद्दीकडे जास्त लक्ष पुरविण्यात आले. अर्थात, सीमारेषा (सरहद्दी) निश्चित करणे, हे कठीण काम आहे. जोन्झ या तज्ज्ञाने नैसर्गिक, राष्ट्रीय, साम्राज्यशाही, कराराधिष्ठित, भौमितीक व राजकीय सत्ता ह्या सीमारेषा निश्चितीच्या संकल्पना सांगितल्या आहेत. वरील गोष्टींच्या अनुषंगाने काहींनी सीमारेषेच्या व्याख्या पुढील प्रमाणे केल्या आहेत.

१) प्रोफेसर मुडी-'दोन राज्यांच्या दरम्यान असलेली राजकीय सत्तादर्शक (Political Power) रेषा म्हणजे सरहद्द किंवा सीमा रेषा होय.'

(A line denoting the political power between the two states is called the boundary.)

२) कार्लसन-'सार्वभौम असलेल्या भूप्रदेशाची बाहेरील हद म्हणजे सीमारेषा (सरहद) होय.'

(The outer margin of the sovereign territories is called the boundary.)

३) पाउंडस्- दोन सार्वभौमराज्ये जेथे एकत्र येतात, त्या मर्यादेला सरहद्द किंवा सीमा रेषा'अशी पाउंडस्ने सरहद्दीची व्याख्या केली आहे.

(The limit where the two sovereign states meet is reffered as boundary.)

४) व्हल्कनबर्ग-'दोन शेजारच्या देशांनी त्यांच्या संमतीने निश्चित केलेली, त्यांच्या प्रदेशाची हद्द म्हणजे सीमारेषा होय.'

(Boundary is the dividing line of common consent between two neighbouring countries.)

थोडक्यात:'सार्वभौम असलेल्या राज्यांच्या नियंत्रणाखालील प्रदेशाची बाहेरील मर्यादा म्हणजे सरहद.'

(Boundary is a line denoting the outer limits of the area under sovereign control of a given state.'

## सरहद्दीची (सीमा रेषांची) निर्मिती (घटक / अंगे):

देशा देशांच्या दरम्यान त्यांचे क्षेत्र दर्शविणाऱ्या सीमा रेषा असतात. यांना सरहद्दी (Boundaries) म्हणतात. यांची निर्मिती आंतरराष्ट्रीय कायदे, करार, मान्यता व वहिवाटीद्वारे होते. हेच सरहद्दीचे घटक (अंगे) आहेत.

१) आंतरराष्ट्रीय कायदे (International laws): दोन देशांच्या दरम्यान सीमा हा सरहद्दीने निश्चित केल्या जातात. यास आंतरराष्ट्रीय कायद्याचा आधार असतो. या सीमारेषेअंतर्गत त्या त्या देशाचा मालकी हक्क असतो. उदा. भारत, पाकिस्तान तसेच इस्रायल पॅलेस्टाईन या देशांच्या सीमा आंतरारष्ट्रीय कायद्याने ठरविल्या आहेत.

२) करार (Treaty): जेव्हा दोन देशाच्या दरम्यान सीमा रेषेविषयी विवाद किंवा तंटा असतो तेव्हा दोन देशांचे प्रतिनिधी एकत्र येऊन समझोता व करार करतात. या कराराने सरहद निश्चित केली जाते. जगातील बऱ्याच देशांच्या दरम्यान असलेल्या सीमारेषा (सरहद्दी) कराराने निश्चित करण्यात आल्या आहेत.

३) मान्यता (Accord): ह्या सीमा रेषा कोणत्याही करार न होता एकमेकांच्या मान्यतेने ठरविल्या जातात. जेव्हा दोन्ही देशांची भूमिका समजुतीची असते. तेव्हा अशा सीमारेषा अस्तित्वात येतात. युरोपातील बऱ्याच देशांच्या सीमा रेषा अशा प्रकारे निश्चित झाल्या आहेत.

४) वहिवाट (Practice): दोन देशाच्या दरम्यान तेथील लोक मुक्तपणे आपआपल्या क्षेत्र मर्यादेत राहतात तेव्हा आपोआप त्या देशांच्या सीमारेषा निश्चित होतात. त्यास आपआपल्या क्षेत्रातील वहिवाट म्हणतात.

## सीमारेषांची (सरहद्दी) कार्ये (महत्त्व) (Functions of Boundaries)

प्रत्येक गोष्टीचे कोणत्या ना कोणत्या प्रकारचे कार्य असते. सरहद्दी (Boundaries) या केवळ जमिनीवर निश्चित केल्या आणि नकाशावर दाखविल्या म्हणजे सर्व काही झाले असे नसून, त्या राज्याच्या दृष्टीने महत्त्वाची कार्ये बजावतात. जोन्स या तज्ज्ञाने सरहद्दींची विविध कार्ये दर्शविली आहेत.

१) **विवाद्य समस्यांची सोडवणूक:** सीमारेषा (सरहद्दी) या दोन राज्यांतील सत्ताफरकामुळे अस्तित्वात येतात. काही वेळा अशा राज्यांच्या स्पष्ट सीमारेषा नसतात किंवा या सीमानिश्चितीच्या वेळी दोन्ही राज्यांचे एकमत झालेले नसते. यांतून दोन्ही राज्यांत नेहमी वाद निर्माण होतात. अशा स्थितीत जगातील इतर मोठ्या राज्यांना हस्तक्षेप करावा लागतो. दोन्ही राज्यांनी समझोता केला नाही, तर त्यांच्यामध्ये युद्ध होण्याची शक्यता असते; म्हणून दोन राज्यांमध्ये सीमारेषेचे स्पष्ट व अचूक रेखांकन करून त्यांच्यातील वाद मिटविण्यास मदत होते.

**२) संरक्षण कार्य:** ज्या प्रमाणे एखाद्या वसाहतीमध्ये वास्तव्य करणाऱ्या प्लॉटधारकांनी आपल्या घराभोवती कंपाउंड बांधले, तर त्यांचे मोकाट जनावरे व भुरट्या चोऱ्या करणाऱ्यांपासून संरक्षण होते, त्या प्रमाणे देशाचे संरक्षण राज्याच्या सीमांद्वारे होऊ शकते. राज्यांमध्ये दुर्गम पर्वत असेल, तर शत्रू सहजासहजी दुसऱ्या राज्यावर हल्ला करू शकत नाही. अर्थात, अलीकडे हवाई युगात अशा सीमांचे महत्त्व कमी झाले असले, तरी अशा सीमांना अजूनही महत्त्व आहे. प्राचीन काळात राज्याचे संरक्षण महत्त्वाचे मानले होते. म्हणून रोमनांनी आपल्या राज्याभोवती भक्कम तटबंदी केली होती. चीनने आपल्या सीमेवर महाविशाल अशी भिंत बांधली, जी Great wall of China म्हणून प्रसिद्ध आहे.

आधुनिक काळात सुरक्षिततेच्या दृष्टीने सीमांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. जेथे कृत्रिम सीमा असतात, तेथे देशाला सीमेवर मोठे सैन्य ठेवावे लागते. या करिता काही देशांनी आपल्या सीमा भक्कम केल्या आहेत. उदा. पाकिस्तानकडून भारताकडे होणारी बेकायदेशीर घुसखोरी थांबविण्यासाठी भारताने पाकिस्तानच्या सीमेवर तारेचे भक्कम कुंपण घातले आहे. यामुळे घुसखोरीला बराच आळा बसला आहे.

**३) अवैध गोष्टींना प्रतिबंध करणे:** दोन देशांदरम्यान निश्चित व भक्कम सीमारेषा असल्यास, त्यामुळे प्रतिबंधित स्वरूपाचे कार्य (Function as barrier) होते. यामुळे एकप्रकारचा अडथळा निर्माण होतो, ज्यामुळे एका देशातून दुसऱ्या देशात लोकांचा मुक्त संचार होऊ शकत नाही. यामुळे बेकायदेशीररीत्या होणाऱ्या मानवाच्या गतिविधीला प्रतिबंध बसतो. शिवाय, मालाच्या वाहतुकीबरोबर दुसऱ्या देशातून दूरचित्रवाणीद्वारे होणारे नियमबाह्य प्रक्षेपण सरहद्दीवरून प्रतिबंधित करता येते.

**४) केंद्रापसारी शक्तीचा प्रभाव कमी करणे:** बऱ्याच वेळा सीमाक्षेत्रात केंद्रापसारी (केंद्रापासून दूर जाणाऱ्या) फुटीरवादी शक्ती कार्य करीत असतात. ह्या शक्ती शेजारच्या देशात राष्ट्रविरोधी कार्ये करीत असतात. यामुळे देशाच्या ऐक्यास व एकात्मतेस तडा जाण्याची शक्यता असते. देशातील अशा विघटनवादी शक्तींना सीमारेषांमुळे (सरहद्दीमुळे) आळा बसतो, ज्यामुळे या शक्ती केंद्रोपगामी (केंद्राकडे) होण्यास मदत होते. उदा. जम्मू- काश्मीरमध्ये काही धार्मिक व राष्ट्रविरोधी लोक दहशतवादी कृत्ये करण्याचा नेहमीच प्रयत्न करतात. परंतु, भारताच्या सीमेवरील भक्कमतेमुळे या शक्तींचा केंद्रापासून दूर जाण्याचा प्रभाव कमी होतो.

५) **वैधानिक कार्य:** सीमारेषांमुळे प्रत्येक देशाला कायदेशीर अधिकार प्राप्त झाले आहेत. त्यामुळे देशांच्या सीमा अचूक व निश्चित असल्यास, देशाला त्या चौकटीत राहून काही गोष्टींची कायदेशीर अंमलबजावणी करता येते. उदा. सीमाशुल्क (वस्तुवार कर लक्षणे) व विदेशी निवासी व्यवसाय उत्पन्नावर करआकारणी करता येते. जे या गोष्टींचे पालन करीत नाहीत, त्यांच्यावर देशाला कायदेशीर कार्यवाही करण्याचे अधिकार असतात.

६) **आर्थिक कार्ये:** सीमारेषांची आर्थिक कार्ये महत्त्वाची समजली जातात. सीमारेषांमुळे दोन देश विभक्त होतात. हे देश आपल्या सीमारेषांतर्गत आपल्या देशाचा व्यापार वाढवू शकतात. सीमेलगतचे देश व्यापारी करान्वये देशातील कच्च्या व पक्क्या मालाला बाजारपेठ प्राप्त करू शकतात. तसेच, दोन्ही देश सीमेलगत असलेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा विकास करू शकतात. महत्त्वाचे म्हणजे सीमारेषांमुळे होणाऱ्या चोरट्या व्यापारास (Smugling) आळा बसून, कायदेशीर व्यापारास चालना मिळते. शिवाय, विदेशातून येणाऱ्या मालावर अधिकृत शुल्क आकारून देशाचे उत्पन्न वाढविता येते.

## सीमारेषांचे (सरहद्दी) बदलते महत्त्व:

१९ व्या शतकाच्या प्रारंभी लॉर्ड कर्झनने एका ठिकाणी असे लिहिले होते,'सरहद्दी (सीमारेषा) या वस्ताऱ्याच्या धारेप्रमाणे असून, त्यावर युद्ध किंवा शांतता, राष्ट्राकरिता जीवन किंवा मृत्यूच्या आधुनिक समस्या टांगल्या आहेत. त्या नंतर १० वर्षांनी सर होल्डिच यांनी अलीकडील जगाच्या इतिहासात बहुतेक महत्त्वाची युद्धे व संघर्ष हे वादग्रस्त सीमारेषांमुळे झाल्याचे म्हटले.

त्यानंतर आंतरराष्ट्रीय सीमा बदलल्या नाहीत, तरी सीमारेषा कमी महत्त्वाच्या दिसतात. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे अलीकडे आंतरराष्ट्रीय संघटनांनी आपल्या सदस्यांदरम्यान मुक्त व्यापार आणि लोकांच्या, तसेच मालाच्या वाहतुकीस स्वातंत्र्य मिळावे, अशी मागणी केल्याने सरहद्दीची (सीमारेषा) कार्ये हिरावली गेली आहेत. तसेच अंतर्गत समस्यांमुळे देशादेशांच्या सीमारेषांचे वादही कमी झाले आहेत. याचाही सरहद्दीवर परिणाम झाला आहे.

स्टिफन जोन्स यांनी लिहिले आहे की, सीमारेषांच्या समस्या या सामान्य स्थितीशी संबंधित आहेत. जरी या समस्या मिटविण्यात आल्या, तरी सर्वकश झगडा तसाच राहणार. पाऊंडस् या तज्ज्ञाने म्हटल्याप्रमाणे आज सीमावाद इतका तीव्र राहिला नसून, ती केवळ एक खूण राहिली आहे. त्यामुळे वास्तवात सीमारेषा ही वस्ताऱ्याची धार राहिली नाही.

## सीमा विभागात मानवी जीवनाचे फायदे-तोटे:

**तोटे (दोष):** ज्या सीमारेषेनजीक लष्करी तळ असतात, तेथील आर्थिक व सामाजिक जीवन विस्कळीत होते. याला बरीच कारणे आहेत.

१) जेथे सीमारेषा असुरक्षित असते, तेथील भूमिउपयोजनावर विविध बंधने असतात. याचा शेतीवर परिणाम होतो.

२) सीमारेषेजवळील मानवी जीवन असुरक्षित असते. त्यामुळे तेथे लोकवस्ती असली, तरी ती विरळ असते.

३) सीमारेषेजवळ साधनसंपत्ती कमी असेल किंवा तो भाग दुर्गम असेल, तर तेथील ग्रामीण लोकसंख्या आणि सामाजिक जीवन अतिशय वाईट होते.

**फायदे (गुण):** परंतु, आंतरराष्ट्रीय सरहद्दीची स्थिती सर्वच ठिकाणी वाईट नसते.

१) काही ठिकाणी, जेथे राज्यांच्या सीमा एकत्र येतात, तेथे सामाजिक सेवा प्रस्थापित होतात. दोन्ही देशांकडून जास्त किमतीचा लाभ व्हावा हा यामागील उद्देश असतो.

२) अशा सीमारेषांजवळ पर्यटक, दुकाने, हॉटेल व लॉजीस सुरू होतात. त्यामुळे लोकांना रोजगार मिळतो.

दोन देशांतील संबंध मित्रत्वाचे व सलोख्याचे असल्यास, दोन्ही राज्यांत उपलब्ध असलेल्या स्वस्त मजुरांचा फायदा घेऊन, छोटे कारखाने सुरू करता येतात.

## सरहद्दींचे वर्गीकरण (Classification of Boundaries)

जगातील सरहद्दी वेगवेगळ्या प्रकारे निर्माण झालेल्या असल्याने, त्यांचे वेगवेगळे प्रकार आहेत. त्यामुळे त्यांचे वर्गीकरण हा क्लिष्ट भाग आहे. त्यांची उत्पत्ती किंवा कार्ये आणि त्यांचा आकृतिबंध या आधारे त्यांचे वर्गीकरण केले जाते.

### उत्पत्ती किंवा कार्यानुसार वर्गीकरण (The Genetic or Functional Classification)

सरहद्दी निश्चिती करताना, सांस्कृतिक भूदृष्याचा (Cultural Landscape) आधार घेतला जातो व या आधारे सरहद्दीचे वर्गीकरण केले जाते. या आधारे रिचर्ड हार्टशोन याने सरहद्दीचे खालील ४ प्रकार दाखविले आहेत.

१) पूर्वऐतिहासिक सीमारेषा (Antecedent Boundaries): सांस्कृतिक भूदृष्ये विकसित होण्यापूर्वी या सरहद्दी निश्चित केल्या जातात. यांना पूर्वनिर्धारित सीमारेषा असेही म्हणतात. बऱ्याच वेळा एखाद्या प्रदेशात (उदा. रुक्ष प्रदेश किंवा इतर मानवविरहित प्रदेश) मानवी वस्ती होण्यापूर्वी सीमारेषा आखल्या जातात व नंतर तेथे वस्त्या होतात. या सीमारेषा स्थिर असतात आणि त्या दोन्ही राज्यांतील अचूक सरहद दर्शवितात. कॅनडा व सं. संस्थानाच्या दरम्यान असलेली सरहद्द याचे उत्तम उदाहरण आहे.

२) स्वभावोद्भूत सीमारेषा (Subsequent Boundaries): वसाहती निर्माण झाल्यावर जेव्हा सांस्कृतिक भूदृष्ये विकसित होतात, तेव्हा निश्चित केलेल्या सरहद्दीला स्वभावोद्भूत किंवा पाठोपाठ निर्माण झालेली सीमारेषा म्हणतात. पूर्व युरोपमध्ये अशा सीमारेषा आहेत. भारत-पाकिस्तान आणि भारत बांगला देश यांच्या दरम्यान असलेल्या सरहद्दी अशा आहेत.

३) अध्यारोपित सीमारेषा (Superimposed Boundaries): सीमारेषेचा हा प्रकार स्वभावोद्भूत सीमारेषेचाच एक विशेष प्रकार आहे. स्वभावोद्भूत सरहद्दीप्रमाणे अध्यारोपित सरहद्दीसुद्धा सांस्कृतिक भूदृष्ये विकसित झाल्यावर निश्चित केल्या जातात. या प्रकारात दोन मानवी समूहांमध्ये सांस्कृतिक भूदृष्ये विकसित झाल्यावर एक सरहद आखली जाते. त्यास दोन्ही राज्यांची संमती असते. मात्र, त्यानंतर तेथेच सामाजिक- सांस्कृतिक परिस्थितीचा विचार न करता, दुसरी सरहद्द निश्चित केली जाते. ही सीमारेषा बाहेरील सत्ताधाऱ्यांकडून तेथील मानवी समुदायावर लादली जाते. आफ्रिकेतील वसाहतीमधील सीमा याची उदाहरणे आहेत. तेथे बाहेरील सत्ताधाऱ्यांनी एका समुदायास विभक्त करून, दोन राज्यांच्या सीमा निर्धारीत केल्या. घाना, टोगोलैंड, दाहोमो, नायजेरिया व सोमालिया या देशांच्या सरहद्दी अशाच प्रकारच्या आहेत. त्याच प्रमाणे उत्तर व दक्षिण कोरिया आणि पूर्वीच्या उत्तर व दक्षिण व्हिएतनामच्या सीमारेषा याची उदाहरणे आहेत.

४) अवशिष्ट सीमारेषा (Relict Boundaries): सध्या ज्यांची राजकीय कार्ये संपुष्टात आली आहेत; मात्र त्यांची सूक्ष्म सांस्कृतिक वैशिष्ट्ये अस्तित्वात आहेत, अशांना अवशिष्ट सीमारेषा म्हणतात. मोठ्या राज्याने लहान राज्य गिळंकृत केल्यावर पूर्वी असलेल्या राज्याच्या सरहद्दीच्या खाणाखूणा तेथे शिल्लक राहतात. उदा. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर संस्थाने देशात विलीन झाली. त्या संस्थानांच्या सीमारेषा आजही आहेत. उदा. हैद्राबाद संस्थानची सीमारेषा. हार्टशोनने सायलेशिया या औद्योगिक प्रदेशातील रशिया व जर्मनीची सीमारेषा ही अवशिष्ट सीमारेषा असल्याचे म्हटले आहे. याची दुसरी उदाहरणे म्हणजे पोलंड व जर्मनी आणि नैऋत्य सं. संस्थानातील स्पॅनिश- अमेरिका व सं. संस्थानाची सीमारेषा ही आहेत.

## रूपबंधात्मक वर्गीकरण (Morphological Classification):

रूपबंध किंवा आकृतिबंध या आधारे सरहद्दीचे (सीमारेषा) प्राकृतिक, सांस्कृतिक व ज्यामितीय सरहद्दी, असे तीन प्रकार पडतात.

**१) प्राकृतिक सरहद्दी (Physiographic Boundaries):** या सरहद्दी प्राकृतिक वैशिष्ट्यांच्या आधारे निश्चित केल्या जातात. उदा. पर्वत, नद्या, सरोवरे, वाळवंट, जंगले, दलदलीचे भाग इत्यादी. म्हणजे या सरहद्दींच्या निर्मितीत नैसर्गिक घटकांचा आधार असतो; म्हणून यांना 'नैसर्गिक सरहद्दी'(Natural Boundaries) म्हणतात. यांना'भौगोलिक सरहद्दी'(Geographical Boundaries) असेही म्हणतात.

प्राकृतिक वैशिष्ट्यांच्या आधारे या सरहद्दीचे प्रमुख ४ प्रकार पडतात.

**अ) पर्वतीय सरहद्दी (Mountain Boundaries):** लांब व उंच पर्वतांच्या अनुरोधाने ह्या सरहद्दी ठरविल्या जातात. जगातील काही देशांच्या सरहद्दी अशा प्रकारे निश्चित केल्या आहेत.

उदा. भारत- चीन सरहद्द हिमालय पर्वताने, भारत-म्यानमार (ब्रह्मदेश) सरहद्द आराकान योमा पर्वताने आणि अफगाणिस्तान पाकिस्तान सरहद्द हाला-सुलैमान पर्वताने, तर चिली व अर्जेंटिनाची सरहद्द अँडिज पर्वताने निश्चित झाल्या आहेत.

फायदे (गुण): या सरहद्दीचे फायदे (गुण) पुढील प्रमाणे आहेत.

१) पर्वत हे जमिनीत भक्कम असल्याने, ह्या सरहद्दी स्थिर असतात.

२) पर्वतीय प्रदेश दुर्गम असल्याने, संरक्षणाच्या दृष्टीने ह्या सरहद्दी सुरक्षित असतात.

तोटे (दोष): १) पूर्वी पर्वतीय सरहद्दी महत्त्वाच्या होत्या; मात्र अलीकडे वाहतुकीमध्ये क्रांतिकारी बदल झाल्याने, तसेच युद्धात क्षेपणास्त्रांच्या उपयोगामुळे या सरहद्दीचे महत्त्व कमी झाले आहे. १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केल्याने, हे सिद्ध झाले आहे. अर्थात, त्यावेळी क्षेपणास्त्रे तेवढी विकसित झाली नव्हती. आता ती खूपच विकसित झाली आहेत; त्यामुळे शत्रू पर्वतीय सरहद्दी ओलांडून दुसऱ्या देशावर हल्ला करू शकतो.

२) पर्वत हे एका रांगेत (रेषेत) नसतात. तेथे लहान- मोठे पर्वत, डोंगर, टेकड्या आणि दऱ्याखोऱ्या असतात. त्यामुळे पर्वतीय भागातून सीमारेषा आखणे कठीण काम असते; म्हणून भारत- चीन दरम्यान मॅकमोहन रेषा अस्तित्वात आली.

पर्वतातून सरहद्द निश्चित करणे अवघड काम असले, तरी दोन्ही देशांच्या सहसंमतीने सीमारेषा ठरविता येते. यासाठी पर्वताच्या उंच माथ्याचा (Highest crest) आधार घेता येतो. यामुळे दोन्ही देशांना वनसंपत्ती, जलसंपत्ती, खनिजसंपत्ती यांचा लाभ घेता येतो, तसेच जलविद्युत निर्मिती, पर्यटन उद्योगाचा विकास करता येतो.

# अ) पर्वतीय सरहद्दी (Mountain Boundaries)






ब) नदी सरहद्दी (River Boundaries): सरहद्दी ठरविण्यास नद्यांचाही उपयोग होतो. नद्यांच्या आधारे आखलेल्या सीमारेषांना नदी सरहद्दी म्हणतात. जगातील काही देशांच्या सरहद्दी नद्यांनी निश्चित झाल्या आहेत. संयुक्त संस्थाने व मेक्सिको या देशांच्या दरम्यान असलेली सरहद्द ही रिओ-ग्रँड नदीने निश्चित झाली आहे.

फायदे (गुण): नदीने ठरविलेल्या सीमारेषांचे काही फायदे (गुण) आहेत. १) नदी रेषाकार (Linear) असल्याने, दोन देशांमधील सरहद निश्चित करणे सोईचे असते. २) नदीमुळे दोन्ही देशांतील लोकांना इकडून तिकडे मुक्त संचार करता येत नाही.

तोटे (दोष): नदी सीमारेषेचे वरील फायदे असले, तरी नदी सरहद्दी ह्या समाधानकारक नसल्याचे दिसून आलो.

१) नदीच्या पात्रातील पाणी एकसंध राहात असल्याने, सीमारेषेने ते कसे विभागावे असा प्रश्न असतो.

२) नदीतून होणाऱ्या जलवाहतुकीमुळे दोन्ही देशांतील सामाजिक व आर्थिक गोष्टींचा मिलाप होतो. काही वेळा तेथे संघर्ष उद्भवनेची भिती असते.

३) नदीच्या आसपास असलेल्या सुपीक जमिनीमुळे तेथे होणाऱ्या वसाहतीमुळे अनेक समस्या निर्माण होतात.

४) काही नद्या वेड्यावाकड्या वळणाने वाहतात. शिवाय, पूरप्रदेशात त्या आपला मार्ग बदलतात. त्यामुळे एका देशाचा प्रदेश, दुसऱ्या देशात जातो.

वरील गोष्टींचा विचार करता, नदीचा एक काठ आणि नदीचा मध्यभाग सीमा रेषा मानून सरहद्द निश्चित केल्यास दोन्ही देशांना नदी सरहद्दीचा लाभ घेता येतो. दोन्ही देश आपल्या देशात जलसिंचन, शेती व उद्योगधंद्याचा विकास करू शकतात.

# ब) नदी सरहद्दी (River Boundaries)



क) सरोवरीय सरहद्दी (Lake Boundaries): काही वेळा मोठ्या सरोवरांचा सीमारेषा ठरविण्यास उपयोग होतो. मात्र, नदीप्रमाणेच यात पाण्याच्या विभागणीचा प्रश्न उद्भवतो. यासाठी सरोवराच्या मध्यभागातून ह्या सीमारेषा आखल्या जातात. यासाठी जगातील काही देशांच्या सीमा सरोवराच्या अनुरोधाने निश्चित केलेल्या आहेत. उदा. सं.संस्थाने व कॅनडा या देशांच्या दरम्यान असलेल्या पंचमहासरोवरांनी (सुपिरिअर, मिशिगन, झुरॉन, एरी व ओंटारियो ही पाच सरोवरे) आफ्रिकेतील झांबिया व झिम्बाब्वे या देशांमधील सरहद्द करीबा सरोवराने, तसेच युरोपातील जर्मनी, स्वित्झर्लंड व ऑस्ट्रीया यांच्या सीमा कॉन्स्टेन्स सरोवराने ठरविण्यात आली आहे.

ड) वाळवंट, जंगले व दलदल सरहद्दी (Desert, Forests and Swamp Boundaries): वाळवंट, जंगले, दलदल यांचादेखील सरहद्दी ठरविण्यास उपयोग होतो. कारण, यामुळे दोन सांस्कृतिक प्रदेशांच्या सीमा निश्चित होतात. उदा. सहारा वाळवंटामुळे युरोपीय विकसित संस्कृती ही आफ्रिकेतील संस्कृतीपासून वेगळी राहिली. ईशान्य युरोपातील जंगलामुळे तेथील दोन संस्कृती वेगळ्या राहिल्या. उदा. तेथील जंगलामुळे फिन व रशियन ह्या संस्कृती अलग राहिल्या. हाईन व म्युस नद्यांच्या दरम्यान असलेल्या दलदलीमुळे बेल्जियम व नेदरलँडमधील लष्करी स्थानावर प्रभाव पडला.

# क) सरोवरीय सरहद्दी (Lake Boundaries)









परंतु, वरील वैशिष्ट्यांचा सीमारेषांसाठी तेवढा प्रभावी उपयोग होत नाही. पाकिस्तान व भारतादरम्यान कच्छच्या रणातील वाळवंटी प्रदेश आहे. पुढे यास आर्थिक महत्त्व आल्यास, त्यास संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्व प्राप्त होईल व त्यामुळे सीमेचा प्रश्न निर्माण होईल.

२) सांस्कृतिक सीमारेषा (Cultural Boundaries): एकाच भूप्रदेशामध्ये भिन्न धर्म व भाषा असलेल्या दोन भिन्न राजकीय प्रदेशांच्या विभागणीसाठी सांस्कृतिक सरहद्दींचा उपयोग होतो. पहिल्या महायुद्धानंतर मध्य व पूर्व युरोपमध्ये अस्तित्वात आलेल्या सरहद्दीचे हे एक वैशिष्ट्य आहे. या सीमेद्वारे अशाप्रकारे प्रदेशाची विभागणी करून, नवीन राज्ये निर्माण होतात. १९४७ मध्ये भारत-पाकिस्तान आणि भारत-बांगलादेश (त्यावेळचा पूर्व पाकिस्तान) हे देश धार्मिक तत्त्वाच्या आधारे निर्माण झाल्यावर, त्यांच्या सीमारेषा यानुसार ठरविण्यात आल्या. अशाच प्रकारे पोलंड व जर्मनीची सरहद्द भाषेच्या आधारावर निश्चित करण्यात आली.

३) ज्यामितीय सीमारेषा (Geodetic Boundarles): प्राकृतिक किंवा सांस्कृतिक घटकांचा आधार न घेता, जेव्हा भूमितीच्या आधारे सरहद्द निश्चित केली जाते, तेव्हा त्यास ज्यामितीय सीमारेषा म्हणतात. नकाशावर ह्या सीमा सरळ रेषेने किंवा वर्तुळाच्या चापाने (Arcs) दर्शवितात. अलीकडे या पद्धतीचा अधिक उपयोग होत आहे. जमिनीवरील भौगोलिक वैशिष्ट्याशी ही सीमा संबंधित असते. ह्या सीमारेषा अक्षवृत्ते व रेखावृत्ते यांना सामान्यपणे समांतर असतात. उत्तर अमेरिका, दक्षिण अमेरिका, आफ्रिका व ऑस्ट्रेलियात अशा सीमारेषा आहेत.

ज्यामितीय सरहद्दी निश्चित करताना, भूप्रदेशातील परिस्थिती (उदा. भूवैशिष्ट्ये. तेथे वास्तव्य करणाऱ्यांच्या इच्छा वगैरे) लक्षात घेतली जात नाही. जेथे ह्या सीमांचे आरेखन होते, तेथे लोकवस्ती अत्यंत विरळ असते. बऱ्याच वेळा तो प्रदेश मानव विरहित असतो. मात्र, सीमा निश्चित झाल्यावर तेथे वस्ती होऊ लागते.

ज्यामितीय सीमारेषा नकाशावर दाखविणे सोपे असते. मात्र, प्रत्यक्षात त्याची आखणी करणे कठीण असते. कारण, प्रदेशात असलेले पर्वत, डोंगर, जंगले, दलदल, वाळवंट इत्यादींच्या सर्वेक्षणाचे काम अत्यंत जिकीरीचे असते. त्या काळात आफ्रिका, दक्षिण अमेरिका वगैरे भागांत असणाऱ्या सत्ताधाऱ्यांना तेथील भौगोलिक परिस्थितीची माहिती नव्हती. त्याचप्रमाणे तेथे बरेच भाग मानव विरहित असे होते. त्यामुळे त्यांना सीमारेषा आखताना कोणत्याही अडचणी आल्या नाहीत.

ज्यामितीय सीमारेषांच्या विशेष वैशिष्ट्यांमुळे मुडी या तज्ज्ञाने पर्वत व नद्यांशी संबंधित सीमारेषांना, ह्या सीमारेषा पर्यायी म्हणून सुचविल्या आहेत.

# ३) ज्यामितीय सीमारेषा (Geodetic Boundarles)



# सीमा (Frontiers)

## सीमाविषयीची संकल्पना (Concept of Frontiers)

‘Frontier’ हा शब्द लॅटिन भाषेतील 'Fron', तसेच फ्रेंच शब्द 'Frout' पासून बनला आहे. याचा अर्थ 'पुढील', 'पुढचा', 'समोरचा', असा होतो. म्हणजे राज्याच्या समोरील किंवा पुढचा भाग म्हणजे सीमा होय.

सीमा ही संकल्पना वैधानिक (Legal) नाही, ती राजकीय (Political) नाही किंवा ती बौद्धिकही (Intellectual) नाही. ही मूलतः नैसर्गिक / सामाजिक (natural / social) संकल्पना आहे.

त्यावेळी दुर्गमतेमुळे कोणताही व्यक्तिसमूह सीमेद्वारे वेगळा झाल्याचे स्पष्ट चित्र नव्हते, तरी त्याकाळात रानटी समूहाचे सीमेद्वारे विभक्त झालेले काही भाग जगात अस्तित्वात होते. तथापि, सीमांना आकार देण्यामध्ये मानवी घटकांचे कार्य स्पष्ट होते. त्यामुळे सीमांचे भाग हे भिन्न जीवन जगणाऱ्या दोन मानवी समूहाच्या संबंधांचे आणि काही बाबतीत एकमेकांत मिसळण्याचे भाग होते.

मानवी संस्कृतीच्या विकासानंतर उपजीविका व चांगले जीवन जगण्याच्या निमित्ताने दोन मानवी समूह ठरावीक ठिकाणी भेटत. त्याचे स्वरूप मात्र राजकीय होते. तसेच, ते आपापल्या क्षेत्रमर्यादेविषयी होते. ही सीमानिर्मितीची सुरुवात होती. त्यासंदर्भात फ्रिस्टॉफ या तज्ज्ञाने म्हटले आहे की, सीमा हा राज्याचा शेवट (end) नव्हता, तर ती सुरुवात (beginning) होती.

अशाप्रकारे मानवी समूहातून राज्ये उदयास आली. मात्र, त्यांच्या दरम्यान कमी- अधिक रूंदीचे मोकळे भाग राहिले. राज्यांच्या दरम्यान असलेल्या अशा भागांना सीमा म्हणतात.

थोडक्यात: 'सीमा म्हणजे दोन राज्यांना विभक्त करणारा, त्यांच्या मधील कमी अधिक रूंदीचा भाग होय.'(" Frontiers are zones of varying with separating the ecumeres of particulars of states.')

सीमाभाग हा दोन राज्यांमधील असल्याने, त्यांच्या समासीय (Marginal) उपयोगाचा भाग त्यात अंतर्भूत असतो; म्हणून यात दोन्ही राज्यांच्या नियंत्रणाखालील राजकीयदृष्ट्या ठरावीक मर्यादा नमूद करण्याची गरज नसते.

**सीमांची निर्मिती (घटक / अंगे)** सीमा Frontiers ह्या दोन देशांच्या दरम्यान असतात. त्यांची निर्मिती दोन भागातील भिन्न परिस्थितीमुळे होते. त्यामुळे त्यांच्या निर्मितीत वेगवेगळे आधार (घटक / अंगे) असतात. जगात सीमांची निर्मिती अशाच प्रकारे झालेली आहे.

१) **प्राकृतिक भिन्नता (Physical Differences):** भूरचना, हवामान, वनस्पती, जलाशय हे प्रमुख प्राकृतिक घटक आहेत. भिन्न प्राकृतिक विभागात राहणाऱ्या लोकांचे जीवनही परस्परापासून भिन्न असते. जसे पर्वतीय व मैदानी प्रदेशात राहणाऱ्या लोकांच्या जीवनात खूप फरक आढळतो. या जलसमुदायांच्या दरम्यान एखादा प्राकृतिक घटक असेल, तर तो घटक त्या समुदायाच्या दरम्यान सीमा बनते. उदा. चीन व भारत या देशातील लोकांच्या जीवनात फरक आहे. या देशांची सीमा हिमायलयपर्वताने निश्चित झाली आहे.

२) **सांस्कृतिक भिन्नता (Cultural Differences):** दोन भिन्न संस्कृत्या असलेले मानवी समुदाय एकत्र येऊ शकत नाही. याला फक्त अपवाद म्हणजे भारत, भिन्न संस्कृती असलेले लोक आपआपल्या सीमा क्षेत्रात जीवन जगत असतात. त्यामुळे भिन्न संस्कृती असलेल्या प्रदेशात सीमा निर्मिती होते. उदा. चीन व रशिया, इराण व अफगाणिस्तान या देशांच्या सीमा.

३) राजकीय भिन्नता (Political Differences): राजकीय भिन्नता हे सीमाचे महत्त्वाचे अंग (घटक) आहे. हा सीमा निर्मितीवर प्रभाव टाकणारा एक महत्त्वाचा घटक आहे. जगातील बहुतेक देश भिन्न राजकीय विचारसरणीचे आहेत. ह्या देशांच्या दरम्यान राजकीय सीमा आहेत. ह्या कृत्रिम किंवा नैसर्गिक असतात. उदा. भारत पाकिस्तानची सीमा ही कृत्रिम तर भारत म्यानमारची सीमा ही नैसर्गिक आहे. मात्र ह्या सीमा राजकीय (Political) आहेत.

**सीमांचे प्रकार:** प्राचीन काळी सीमांचे स्पष्ट असे चार प्रकार होते.

**१) नैसर्गिक किंवा प्राकृतिक सीमा (Natural or Physical Frontiers)-** प्राचीन काळात मोठे, रूंद, मानवी जीवनास प्रतिकूल आणि पूर्णतः मानवविरहित प्रदेश दोन राज्यांच्या दरम्यान सीमा मानल्या होत्या. त्यावेळी दुर्गम पर्वत, नदया, जंगले व वाळवंटे या प्राकृतिक वैशिष्ट्यांचा सीमानिश्चितीसाठी उपयोग होत असे. पूर्वी मध्य आशिया व चीन आणि मॅकमोहनरेषा अस्तित्वात येईपर्यंत चीन व भारतादरम्यानची सीमा हिमालय पर्वतश्रृंखलेने निश्चित झाली होती. लॅटिन अमेरिकेत अॅमेझोनचे दुर्गम खोरे ही तेथील सीमा आहे.

**२) वांशिक सीमा (Ethnic or Anthropological Frontiers)-** दोन राजकीय सत्तांच्या दरम्यान जेथे अत्यंत विरळ लोकवस्ती आहे आणि जेथील लोक राज्यातील रहिवाशांपेक्षा मागासलेले आणि गौण दर्जाचे आहेत, अशा भागाचा सीमा म्हणून त्यावेळी उपयोग केला जात असे. या सीमेचे उत्तम उदाहरण म्हणजे त्याकाळातील स्लाव्ह लोकांनी व्याप्त प्रदेश होय. त्यावेळी बाल्कन प्रदेशातील स्लाव्ह लोकांचा प्रदेश हा युरोपच्या आग्नेयेस तुर्की व जर्मन लोकांनी व्यापलेल्या त्यांच्या प्रदेशांमधील सीमा होती.

३) जामितीय किंवा खगोलशास्त्रीय सीमा (Ethnic or Astronomical Frontiers)- अपरिचित अशा अंतर्गत भागात पूर्णतः मोकळ्या किंवा काही प्रमाणात पाहणी झालेल्या प्रदेशातून भौगोलिक घटकांचा आधार न घेता आखलेल्या सीमेला जामितीय किंवा खगोलशास्त्रीय सीमा म्हणतात. पूर्वी ब्रिटिश वसाहती असलेल्या युरोपीय सत्ता आणि माहीत नसलेल्या आफ्रिकेतील मोकळ्या प्रदेशांतून भौगोलिक घटकांचा विचार न करता, सरळ अशा ह्या सीमा आखल्या होत्या. त्यावेळी ब्रिटिशांनी समुद्रकिनाऱ्यापासून अंतर्गत भागाकडे अशा सीमा आखल्या होत्या.

४) राजकीय सीमा (Political Frontiers)- दोन स्पष्ट अशा राजकीय सत्तांच्या दरम्यान असलेली सीमा ही राजकीय सीमा होय. पूर्वी दक्षिण आशियात ब्रिटिश साम्राज्य, पश्चिम आशिया व आग्नेय युरोपच्या पलीकडे तुर्की साम्राज्य आणि उत्तरेकडील परीघावर रशियन साम्राज्य यांच्या राजकीय सीमा पश्चिमेस इराणपासून हिंदुकुश पर्वतापर्यंत अशा होत्या.

इतर प्रकार याशिवाय सीमांचे खालील दोन प्रकार पडतात.

अ) विवाद्य सीमा (Ideological Frontier): दोन राज्यांच्या शीतयुद्धातून अस्तित्वात आलेली सीमा ही अशा प्रकारची असते. मध्य युरोपात रशियन राज्य व अटलांटिक भूमध्यसागरी सत्ता यांच्यात अशी सीमा गेल्या काही वर्षांपर्यंत अस्तित्वात होती. दोन आर्थिक भिन्नतेशी या सीमांची तुलना होते.

ब) वसाहती सीमा (Settlement Frontier): वसाहती सीमा ही सत्तेच्या अधिकारक्षेत्रात मोकळ्या प्रदेशाचे विस्तारीकरण केल्यावर निर्माण होते. दुसऱ्या शब्दांत राष्ट्रांच्या भूप्रदेशाचा विस्तार केला जातो; मात्र असा भाग प्रतिकूलतेमुळे व्यापला जात नाही. अशा सीमांचे स्वरूप गतिमान असते, सामाजिक असते.

## सीमा व सीमारेषा मधील फरक:

बऱ्याच वेळा सीमा व सीमारेषा या दोन्ही संज्ञा समान अर्थाने वापरल्या जातात. मात्र, या दोन्ही संकल्पना भिन्न आहेत. सीमा ही प्राचीन राज्याच्या संकल्पनेशी संबंधित असून, सीमारेषा ही आधुनिक सार्वभौम राज्याच्या भूप्रदेशाशी निगडित आहे. व्युत्पत्तीवरून त्यांच्यातील फरक लक्षात येतो. संक्षेपाने या दोन्हीतील फरक पुढीलप्रमाणे आहे.

१) सीमा राज्याच्या बाहेरील (Outer oriented) भाग, तर सीमारेषा अंतर्गत (Innner oriented) भाग दर्शविते.

२) सीमा ही केंद्रापसारी प्रभाव (बाहेरील दिशेने) (Centrifugal force), तर सीमारेषा केंद्रोपगामी (अंतर्गत दिशेने) प्रभाव (Centripetal force) दर्शविते.

३) सीमा हा दोन राज्यांमधील एका बाजूकडून अखंडत्वदर्शक घटक (Integrating factor) असून, सीमारेषा दोन राज्यांमधील विभक्त दर्शक घटक (Separating factor) आहे.

४) सीमा ह्या राज्यांमधील भौगोलिक प्रदेशातील संक्रमणस्वरूप (Transitional nature) दर्शवितात. त्यामुळे त्या भौगोलिक (Geographical) असतात. सीमारेषांचे स्वरूप हे राजकीय (Political nature) असल्याने, त्यांची उत्पत्ती राजकीय कार्यातून झालेली आहे.

५) सीमांचे स्वरूप हे क्षेत्रीय (Areal), तर सीमारेषांचे स्वरूप हे रेषायुक्त (Linear) आहे.

६) स्वरूपाने सीमा ही प्राचीन घटना (Phenomemon of the past), तर सीमारेषा ही आधुनिक घटना (Phenomemon of the present) आहे.

७) सीमा ह्या प्राकृतिक, भाषिक, धार्मिक किंवा वांशिक असतात. त्या स्थिर (Stable) असतात. त्यांचे स्वरूप व कार्य बदलले, तरी त्या मूळ स्वरूपात असतात. याउलट, सीमारेषा जरी स्थिर असल्या, तरी शेजारील राज्यांच्या सत्ताबदलाचा यांच्या स्थानावर परिणाम होतो. दुसऱ्या महायुद्धापर्यंत सीमारेषांत बदल झाल्याची बरीच उदाहरणे आहेत. अलीकडे रशिया, युगोस्लाव्हिया इत्यादी देशांच्या सीमारेषा बदलल्या आहेत.

८) सीमा हे कमी अधिक रूंदीचे प्रदेश असतात. सीमारेषांना असा ठरावीक जाडीचा प्रदेश नसतो, कारण ती एक रेषा असते.

९) सीमाक्षेत्रात मानववस्ती किंवा मानवविरहित प्रदेश असू शकतो. मात्र, सीमारेषा ही रेषा असल्याने, त्यावर मानवी वस्ती असू शकत नाही.

१०) दोन राज्यांतील सीमाभाग नैसर्गिक असतो; परंतु सीमारेषा ही नैसर्गिक (पर्वत, नद्यांद्वारे निश्चित केलेली) किंवा कृत्रिम (कुंपण, दगड, खांब इत्यादीने निश्चित केलेली) असते.

११) दोन राज्यांतील सीमाभागात स्पष्ट फरक (भिन्नता) दिसून येतो, तसा सीमारेषांच्या दोन्ही बाजूस दिसत नाही.